सं. फौ.ख.क्र. १४८/२०२१
सरकार वि. कृष्णदेव
निशाणी २२

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांची साक्ष

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– वैभव बाबासो बोराडे
**वय** :– ३७ वर्षे, **धंदा** :– पोलीस पाटील
**राहणार** :– शेरेवाडी ता. आटपाडी, जि. सांगली

## सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्रीमती. ए. पी. केसकर, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत

**०१.** मी सन २०१७ पासून शेरेवाडी गावचा पोलीस पाटील म्हणून काम करत आहे. माझ्याकडे विठलापूर गावाचा अतिरिक्त कार्यभार आहे. महेश कांतीलाल काळे यांना मी ओळखतो. ते विठलापूर येथे कृषि सहाय्यक अधिकारी म्हणून कार्यरत होते.

**०२.** घटना पाच वर्षांपूर्वी घडली होती. त्यादिवशी मी आणि महेश काळे असे जिल्हा परिषद शाळा विठलापूर समोर थांबलो होतो. त्यादिवशी विठलापूर गावाची सरंपच निवड असल्यामुळे आम्ही शाळेसमोर थांबलो होतो. आम्ही समजले की, विठलापूर–दिघंची रस्त्यावर अपघात झाला आहे. त्यानंतर मी आणि महेश काळे असे माहिती मिळालेल्या ठिकाणी गेलो. त्याठिकाणी एक इसम मोटारसायकलवरुन खाली पडलेला दिसून आला. त्याठिकाणी एक डंपर उभा होता व त्याचे तोंड विठलापूरच्या दिशेने होते. डंपर मधील मुरूम टाकताना डंपरचा हौदा वरच्या दिशेने असल्याचे दिसले व एक विजेची तार तुटलेली दिसली. मला असे लोकांकडून समजले की, तार तुटून दुचाकीला अडकली व अपघात झाला, डंपरच्या चालकाने वर तार आहे हे पाहिले नव्हते.

**०३.** दुचाकीवरुन पडलेल्या इसमाच्या डोक्याला जबर मार लागलेला दिसले व रक्त येत होते. त्यानंतर गावामध्ये बंदोबस्ताकरीता असलेले पोलीस

**सं. फौ.ख.क्र. १४८/२०२१**
**सरकार वि. कृष्णदेव**
**निशाणी २२**

लगेच त्याठिकाणी आले. रक्त जास्त वाहत असल्यामुळे आम्ही त्या इसमास पिकअप मध्ये टाकून आटपाडी येथील सरकारी दवाखान्यात दाखल केले. जखमींचे आडनाव बनसोडे होते व ते महेश काळे यांच्या परिचयाचे होते. बनसोडे यांचा उपचार सुरू असताना मृत्यू झाला. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती व माझा जबाब नोंदविला होता.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे – श्री. एस.व्ही.पाठक विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु</u>**

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, मी शेरेवाडी येथे राहतो. पोलीसांना जबाब देताना माझ्याकडे विठलापूर गावचा अतिरिक्त कार्यभार असलेले कागदपत्र मी पोलीसांना दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या गावात एखादी घटना झाल्यास त्यास घटनेबाबत पोलीस ठाण्यात कळविणे हा पोलीस पाटील चे कर्तव्याचा एक भाग आहे. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित घटना मी प्रत्यक्ष पाहिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतःहून फिर्याद नोंदविली नाही. असे घडले होते की, मी बयाण देताना पोलीसांना डंपरचा क्रमांक सांगितला होता. मी पोलीसांना ज्या पिकअप मधून जखमी इसमास घेवून गेलो होतो, त्या पिकअपचा क्रमांक सांगितला नव्हता.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, आटपाडी येथील ग्रामीण रुग्णालय हे आटपाडी ग्रामपंचायत हद्दीत येते. हे म्हणणे खरे आहे की, २०२१ साली आटपाडी हे ग्रामपंचायतीचे केंद्र होते. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित घटनास्थळ हे विठलापूर ग्रामपंचायतीच्या हद्दीत येते. हे म्हणणे खरे आहे की, आटपाडी, विठलापूर आणि मापटेमळा यांच्यासाठी तीन स्वतंत्र ग्रामपंचायती २०२१ साली होत्या. हे म्हणणे खरे आहे की, एखादा व्यक्तीचा मृत्यू ज्या ग्रामपंचायतीच्या हद्दीत होतो, त्या ग्रामपंचायत दप्तरी त्या मृत्यूची नोंद केली जाते. असे घडले नाही की, माझ्या समक्ष पोलीस ए. ए. पाटील यांनी स्थानिक चौकशी केली व जबाब नोंदविले होते.

**सं. फौ.ख.क्र. १४८/२०२१**
**सरकार वि. कृष्णदेव**
**निशाणी २२**

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, पोलीस पाटलाचे कृषी खात्यामध्ये जाणे–येणे असते. हे म्हणणे खरे आहे की, त्या जाण्या–येण्यामधून माझी आणि महेश काळे यांची ओळख झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, मयत बनसोडे हे कृषी विभागाता कार्यरत होते. हे म्हणणे खरे नाही की, मयताला मदत व्हावी म्हणून मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील आरोपीच्या हिताविरुध्दचा मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,
समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2026.02.23 15:41:19 +0530

दि. २३/०२/२०२६
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी